NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014
YEAR : 37) 1 st August 2012 (No. of Pages -8) ( No : 06

# *A I F U C T O*

## ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

23/2/1A.K.B.SARANI, KOLKATA-7000 80 : E-Mail: asok.barman@gmail.com : (Mob)-9831276815
Prof.Asok Barman, General Secretary

**MOST URGENT : 09.07.12**

DECISIONS OF NEC MEETING HELD IN PATNA ON 8TH JULY, 2012

The following decisions have been taken by the NEC:

# HUNGER STRIKE IN STATES AND DELHI

All affiliates will observe Hunger Strike in states on 25th August,2012 for the following demands.. Memorandums will be submitted to the Chief Ministers & Governors With the following demands- **(a)** Immediate payment of arrears by the Central and state Govts. **(b)** Stop commercialization of higher education. **(c)** Remove anomalies in UGC Regulations (pay scales & Ph.D) & date extension of RC/OC. **(d)** Notification of CAS by the state govts. **(e)** Payment of justified salaries following UGC & AICTE pay scales to contractual, Ad Hoc, part time, guest teachers by the state funded universities, colleges, research institutes and self financing institutions. **(f)** Complete parity between teachers, librarians and DPEs regarding pay scales and retirement age. **(g)** Withdrawal of new pension scheme and national debate on the educational bills.

# HUNGER STRIKE PROGRAM IN DELHI

Hunger strike program will be held in Delhi on 28,29 & 30 August, 2012 The participation of states will be as per the list given below- **(a)** Date- 28.08.2012. Uttar Pradesh, Punjab, Haryana, Himachal Pradesh, J & K, Uttarakhand. Rajasthan,J&K **(b)** Date-29.08.2012, West Bengal, All North Eastern States, Bihar, Jharkhand, Gujarat.Goa.Orissa. Chattishgarh. **(c)** Date -30.08.2012, Kerala, **Maharashtra,** M.P. Tamilnadu, Andhra Pradesh Karnataka, Pondichery. All others.

**VENUE-JANTAR MANTAR , TIME: 10.A.M TO 6 P.M**

PLEASE ENSURE MAXIMUM PARTICIPATION.

**Send telegram,e-mail and fax to the PM & MHRD**

All units are requested to send telegram,e-mail and fax to the PM & MHRD for the release of arrears for the new pay scales

### Golden Jubilee Celebration Program

Please follow the instructions given in the last circulars. The Celebration will be at unit, state and national levels. All affiliates are to collect Rs.20 only per member and send the money at the earliest. All state federations and associations are requested to contact the office bearers, especially in their regions for attending the programs. Meetings, seminars, lectures and exhibitions, are to be organized and literature on the achievements of the AIFUCTO movements. Contact retired members, activists & leaders to participate in the Golden Jubilee Celebration programs. Detailed guidelines

have already been circulated. Please refer to previous circular in the website/TM for the same

Some affiliates have already chalked out programs and started holding functions. Please send such information to the General Secretary.

**Asok Barman**, General Secretary

### NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

**जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणीच्या तातडीच्या सभा**

संघटनेच्या जिल्हा कार्यकारी मंडळांच्या व तालुका कार्यकारी मंडळांच्या तातडीच्या बैठकी आयोजित करण्यात याव्यात. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व तालुका पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये दौरे आयोजित करुन उपरोक्त २५ ऑगस्ट २०१२ रोजीचा राज्याच्या राजधानीतील व ३० ऑगस्ट २०१२ रोजीचा केंद्रिय राजधानीतील उपरोक्त कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यरत व्हावे **अशी विनंती करण्यात येत आहे.**

स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी**
*अध्यक्ष*

स्वा / **डॉ. अनिल ढगे**
*सचिव*

(Ministry of Information & Broadcasting)

New Delhi, Dated 20-July, 2012 : Cabinet 20-July, 2012 10:28 IST

## Relaxation of condition relating to enhancement of age of superannuation of teachers in state institutions consequent of the implemen- tation of the revised pay scales on the basis of 6 th Pay Commission recommendations

The Cabinet today approved the proposal to relax the condition of enhancement of age of superannuation of teachers to 65 in state institutions for the implementation of the revised pay scales on the basis of 6 th Pay Commission recommendations and become eligible for receiving Central share of 80% of the arrear payment.

It also decided that reimbursement of 80% of the Central share of the arrears be paid in 2-3 instalments to those States who have already made the payment and submitted their proposals for reimbursements to the Central Government.

The decision of Cabinet is expected to provide relief to teachers in State institutions with the payment of arrears. It will also benefit State Governments, who will be able to make the arrear payment in instalments and also claim reimbursements simultaneously.

**Background:**

Following the revision of pay scales of Central Government employees on the recommendation of the 6 th Pay Commission, the pay scales of teachers and other equivalent cadres was revised and age of superannuation was enhanced to 65 in December 2008. The scheme of revised pay scales was essentially for teachers in Central Educational Institutions. However, provisions of the Scheme could be made applicable by State Governments, to Universities and Colleges coming under the purview of the State Governments, provided the State Governments adopt and implement the scheme as a composite scheme, including the enhanced age of superannuation.

The Central Government decided to provide financial assistance to the extent of 80% as reimbursement to those State Governments, which may opt for these revised pay scales for the period 1.1 2006 to 31.3.2010 The remaining 20% was to be met by the State Government from its own resources. The Central assistance was subject to the condition relating to the enhancement of the age of superannuation of university and college teachers to 65 years.

Many State Governments had requested the Central Government to waive the condition relating to enhancement of age of superannuation of teachers to 65 years as they were finding it difficult to accept the condition relating to enhancement of age of superannuation and the condition that the State Governments should first disburse the arrears and then seek reimbursement from Central Government to the extent of 80% of these arrears.

SH/RK/SK **AF : P34 ** (Release ID :85417)

*A I F U C T O*

ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

23/2/1A.K.B.SARANI, KOLKATA-7000 80 : E-Mail: asok.barman@gmail.com : (Mob)-9831276815

Prof.Asok Barman, General Secretary

# HUNGER STRIKE PROGRAM : CANCELLED

## COMMUNICATION FROM GENERAL SECRETARY
## Urgent Communication from GS : 25/07/2012

Congratulations to our members on the great achievement once again. The united and determined movement launched by the AIFUCTO for **the payments of arrears by the Govt. of India without insisting on the enhancement of the retirement age to 65 years has now been approved by the Union Cabinet.** Our rallies, protracted follow up and the Court Arrest Programmes have made it possible.

We thank Hon'ble President Sri Pranab Mukherjee & Hon'ble Minister, HRD Sri Kapil Sibal for their support. We record our thanks to the Members of Parliament who have lent valuable support.

In view of the development, the Secretariat, after considering the General Secretary's consultations with office bearers and NEC members throughout the country, **decided not to organize the HUNGER STRIKE in Delhi on 28, 29 and 30th August, as decided earlier by the Patna NEC meeting.** We understand that the decisions regarding matters relating to different issues including anomalies, RC/OC, Ph.D

The Secretariat will review the entire situation and a NEC meeting will be held in September, 2012 to assess the same and decide future course of action.

States might have state related issues and so may decide about holding the state program on 25th August, 2012.

**Asok Barman,** General Secretary

**AF : P36 **

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

We are informed by Prof. Shivajirao Patil, President of MFUCTO, that the hunger strike program organized at Mumbai on 25th August 2012 is cancelled in view of the developments at the central level.

**Dr.Pravin Raghuwanshi,** President
**Dr. Anil Dhage,** Secretary

*(रविवार, दिनांक २९ एप्रिल २०१२ च्या दै.'हिंदुस्थान' मध्ये प्रकाशित झालेला प्रा.बी.टी.देशमुख यांचा पुढील लेख जसाच्या तसा प्रसृत करीत आहोत.-**संपादक**)*

**१.** अलिकडे आता ती पद्धती बंद झालेली दिसते. पण पूर्वीच्या काळात दुय्यम निबंधकाच्या कचेरीत दस्तऐवज नोंदवितांना "**हे खरेदीखत नशापाणी न घेता मी अक्कलहुशारीने लिहून दिले आहे.**" असे एक वाक्य नोंदविलेल्या प्रत्येक दस्तऐवजात समाविष्ट करण्याचा शिरस्ता होता. कोणताही शासननिर्णय काढतांना आता यापुढे "**हा शासननिर्णय काढणाऱ्या अधिकाऱ्याने नशापाणी न करता पूर्णपणे सावध स्थितीमध्ये हा शासननिर्णय काढलेला आहे.**" असे वाक्य प्रत्येक शासननिर्णयाच्या शेवटी टाकण्याचा नविन शिरस्ता निर्माण करण्याची गरज आहे असे वाटावे इतका हास्यास्पद, पोरकट व निर्बुद्धपणाचा शासननिर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १९ एप्रिल २०१२ रोजी निर्गमित केलेला आहे.

## एवढे मोठे आंदोलन सुरु झाल्यावर ४ महिन्यांनी जाग आली

**२.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने १५ जानेवारी २०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत आंदोलनाचा ठराव सम्मत केला होता. त्या संघटनेच्या अध्यक्ष व सचिवांनी १८ जानेवारी २०१२ रोजी राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना व उच्च शिक्षण मंत्र्यांना याबाबतचे सविस्तर निवेदन स्वतः भेटून दिले व निवेदन मिळाल्याची पोचपावती दोनही कार्यालयातून प्राप्त केली. आता हे आंदोलन सुरु झाल्यावर जवळ जवळ चार महिन्यांनी मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना जाग आली व त्यांची धावपळ सुरु झाली. या धावपळीच्या पोटी घाईघाईने त्यांनी १९ एप्रिल २०१२ चा शासननिर्णय काढला. "**अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन फरकाच्या व इतर देय रक्कमा अदा करण्याबाबत**" या मथळ्याचा हा नामांकित शासननिर्णय सोबत प्रकाशित केला आहे (नुटा बुलेटीनच्या सन २०१२ च्या पृष्ठ ४४ वर). खरे म्हणजे संघटनांशी चर्चा केली असती तर असा शासननिर्णय काढण्यातील निर्बुद्धपणा दोन मिनिटात शासनाच्या लक्षात आला असता.

## सन २००९ मध्येच शासननिर्णय निघालेला आहे हे शासनाला ठावूकच नाही

**३.** संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविणे, त्यांच्याशी चर्चा करणे, प्रस्तावित मसुदा त्यांना दाखविणे, आपल्या मसुद्यात काही चुका असतील तर त्याबाबतचे म्हणणे ऐकून घेणे, संघटनेचे पदाधिकारी दाखवितात त्या चुका खरोखरच आपल्या मसुद्यात असतील तर त्याप्रमाणे आपला मसुदा दुरुस्त करणे, **परिणामी बिनचूक असा शासननिर्णय बाहेर पडणे ही प्रक्रियाच आता उच्च शिक्षण विभागात बंद पडलेली आहे.** शिवाय आम्ही करतो ते शंभर टक्के बरोबर आहे हा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा अहंकार पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची जुनी प्रथा चालू ठेवली तर दुखाविला जातो. या अहंकाराच्या पोटीच १९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयाचा जन्म झालेला आहे. पोरकटपणा व निर्बुद्धपणाची कमालमर्यादा अशी की एकाबाबतीत मंत्रिमंडळाच्या व वित्तविभागाच्या सम्मतीने शासननिर्णय सन २००९ मध्येच निर्गमित झालेला आहे. याची आठवण सुद्धा न रहाण्याचा हास्यास्पद प्रकार या शासननिर्णयात अंतर्भूत आहे.

## मंत्रिमंडळाच्या व वित्तविभागाच्या मान्यतेने निर्गमित झालेला शासननिर्णय

**४.** सन २००९ मध्ये "Revision of pay Scales of teachers and equivalent cadres in Higher Education as per UGC Scheme (6th Pay commission) Universities, Affiliated Colleges, Government Colleges/ Institutes of Science etc." या मथळ्याचा व "GOVERNMENT OF MAHARASHTRA

# A I F U C T O

## ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

23/2/1A.K.B.SARANI, KOLKATA-7000 80 : E-Mail: asok.barman@gmail.com : (Mob)-9831276815

Prof.Asok Barman, General Secretary

## COMMUNICATION FROM GENERAL SECRETARY : 17.07.2012

General Secretary has been camping in Delhi except for some urgent visits to some states for attending meetings. He has been following up the pending issues including payment of arrears, removal of anomalies, scrapping of points system for CAS, extension of the dates for RC/OC, changes in the Ph.D Regulations. He carried the decisions of the Patna NEC meeting to the UGC and MHRD.That the AIFUCTO wants the issues to be resolved immediately & that our members would launch Hunger Strike in both states (25th August) and in Delhi(28th to 30th August) were conveyed to the concerned authorities.

The General Secretary has been meeting the Members of Parliament and requesting them for raising the AIFUCTO demands in both the Lok Sabha & the Rajya Sabha.

All state leaders are earnestly requested to write to the MPs and Central Ministers from their states immediately so that they can intervene by raising questions in the ensuing Monsoon Session of Parliament which is to begin in the first week of August, 2012.Also request them to address the Hunger Strike Venue Jantar Mantar in Delhi.

The affiliates are also requested to write to the state governments informing about the Hunger Strike program in the respective states and to write to the central government for an early payment of arrears.

The General Secretary requested MHRD to fix up a meeting with AIFUCTO leadership to discuss various matters including our demands & the worsening condition in higher education due to the very large number of vacant posts in states.

Greetings

शासननिर्णय निर्गमित झाला आहे. (यापुढे २००९ चा शासननिर्णय असा उल्लेख) या शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये “This Government Resolution is according to the decision taken by the **State Government** on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31.12.2008.” असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये असाही उल्लेख आहे की, “**These orders issue with the concurrence of the Finance Department vide their unofficial reference No.395/ SER.9, dated 10-08-2009**” याचा सरळ अर्थ असा आहे की, हा शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निर्गमित झाला आहे. तर मग या शासननिर्णयाची दोन अडीच वर्षे अम्मलबजावणी का होत नाही? ही कुंभकर्णी झोप घेणारे अधिकारी आंदोलन सुरु झाल्यानंतरच चार महिन्यानी का जागे होतात?

### शासननिर्णय निघाला केंव्हा? कोणत्या तारखेपासून लागू झाला व थकबाकी

**५.** सन २००९ चा शासननिर्णय १२ ऑगस्ट २००९ रोजी निघाला. नविन शासननिर्णयाप्रमाणे वेतननिश्चिती होवून प्रत्यक्ष सुधारित वेतनानुसार वेतन देणे माहे फेब्रुवारी २०१० पासून सुरु झाले. सन २००९ च्या या शासननिर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट तरतुद आहे. :-

“**(9) Date of Implementation of revised pay and allowance and payment of arrears:-**

special allowances as applicable shall take effect from 1.09.2008.

**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009. The 80% of the amount of arrears admissible for the period from 1st day of January 2006 to 31st March 2009 will be paid in cash on receipt of the grants from Government of India.** The remaining 20% amount will be credited to Provident Fund as per the procedure adopted for the State Government Employees.”

२००९ च्या ह्या शासननिर्णयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी १ जानेवारी २००६ पासून लागू होईल मात्र थकबाकीचे दोन भाग पाडले जातील. ते पुढील प्रमाणे :-

(१) १ जानेवारी २००६ पासून तर ३१ मार्च २००९ पर्यंतच्या फरकाला थकबाकी असे संबोधिले जाईल.

(२) १ एप्रिल २००९ पासून चे सुधारित वेतन रोखीने दिले जाईल.

### शासननिर्णयाची अम्मलबजावणी करणे अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही काय?

**६.** प्रत्यक्षात फेब्रुवारी २०१० पासून सुधारित वेतन मिळणे सुरु झाले असले तरी १ एप्रिल २००९ पासून तर ३१ जानेवारी २०१० या काळातील

## सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती-४४४ ६०४

*दुरध्वनी क्रमांक ०७२१ - २५३१२३५*

### क्रमांक ससं/उशि/अनु-४/१२/३८७२ : दिनांक ०६.०७.२०१२

प्रति,
प्राचार्य, सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी
आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालये, अमरावती विभाग, अमरावती

**विषय** :- सहाव्या वेतन आयोगानुसार शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०४.२००९ ते दिनांक ३१.०१.२०१० (१० महिने) कालावधीतील वेतन फरकाच्या रक्कमेबाबत (पहिला हप्ता)

**संदर्भ** : १. मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांचे पत्र क्रमांक - अर्थसं-२०१२/(५१/१२)/लेखा २ दिनांक ०२ जुलै, २०१२

२, मा, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्रमांक - अर्थसं-२०१२/(५१अ/१२)/लेखा २ दिनांक ०२ जुलै, २०१२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविल्या प्रमाणे येते की, शासन निर्णय क्रमांक एनजीसी २००९/(२४३/०९)-युएनआय-१ दिनांक १२ ऑगस्ट, २००९ अन्वये अकृषि विद्यापीठांशी सलग्नित असलेल्या अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागु झालेला आहे. सदर शासन निर्णयामधील तरतुदी नुसार अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १.४.२००९ ते ३१.१.२०१० (१० महिने) या कालावधीतील सहाव्या वेतन आयोगानुसार रोखीने वेतन द्यावयाचे आहे. शासनाने शासन निर्णय क्रमांक बैठक-२०११/(२४६/११)मशि-३, दिनांक ८ जून २०१२ नुसार अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १.४.२००९ ते ३१.१.२०१० (१० महिने) या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम दोन हप्त्यात देण्याचा निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक ०१.०४.२००९ ते ३१.०८.२००९ पर्यंत पहिल्या पाच महिन्याची रोखीने द्यावयाची थकीत रक्कम देण्याची माहिती दिनांक १०.०७.२०१२ पर्यंत दरमहा सादर करण्यात येणाऱ्या वेतन देयकाप्रमाणे सादर करावी व या पाच महिन्याची एकत्र गोषवारा पहिला हप्त्या ची रक्कम सादर करावी.

तसेच दिनांक ०१.०९.२००९ चे ३१.०१.२०१० (पाच महिने) दरमहा सादर करण्यात येणाऱ्या वेतन देयकाप्रमाणे सादर करावी. या पाच महिन्याची एकत्र गोषवारा विवरण पत्र २ मध्ये दुसरा हप्त्या ची रक्कम सादर करावी.

ही माहिती सादर करतांना त्यामध्ये सेवानिवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालयातील शिक्षक कर्मचारी निहाय फरकाचे तक्ते (Due, Drawan, Diffrence) सादर करावे.

२. फरकाच्या तक्त्यानुसार महाविद्यालयाची एकुण (Diffrence) ची रक्कम सादर करावी.

३. या माहिती मध्ये अनुदानित शाखेतील अनुज्ञेय पदावर कार्यरत असलेले शिक्षक कर्मचाऱ्यांच्याच थकीत वेतनाची माहिती सादर करावी.

४. या माहिती मध्ये नियमानुसार या कार्यालयाकडुन मान्य केलेली वेतन निश्चिती व लेखापरिक्षक (उच्च शिक्षण) अमरावती विभाग, अमरावती यांनी मान्य केलेल्या वेतन निश्चितीच्या पडताळणी नुसारच शिक्षक कर्मचाऱ्यांची थकीत वेतनाची माहिती सादर करावी.

५. कोणत्याही परिस्थितीत चुकीची किंवा थकीत रक्कमेचे जादा प्रदान होणार नाही याची दक्षता घ्यावी. चुकीची किंवा जादाची रक्कम प्रदान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

सदर माहिती विवरण पत्र २ मध्ये एमएस २००३ Excel मध्ये सॉप्ट व हार्ड कॉपी या कार्यालयात दिनांक १०.०७.२०१२ पर्यंत न चुकता सादर करावी.

या परिपत्रकासोबत ज्या विवरणपत्रामध्ये माहिती मागविण्यात आलेली आहे त्या विवरणपत्रामध्ये/रकान्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करण्यात येवू नयेत.

माहिती सादर करतेवेळी सोबत दिलेले प्रमाणपत्र प्राचार्यांनी सादर करणे आवश्यक आहे.

विवरणपत्र २

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | शिक्षक कर्मचाऱ्यांचे नाव | दिनांक १.४.२००९ ते ३१.१.२०१० या कालावधीतील रक्कम मुळ वेतनासह देय असणारे इतर अनुषंगीक भत्ते धरुन | पहिल्या हप्त्याची रक्कम | दुसऱ्या हप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" वित्त विभागाची मान्यता झाली, मंत्रिमंडळाची मान्यता झाली, शासननिर्णयात स्पष्टपणे १ एप्रिल २००९ पासून सुधारित वेतन रोखीने द्यावे असे नमुद असतांना गेल्या ३२ महिन्यात हा फरक का अदा करण्यात आला नाही? हा खरा प्रश्न आहे? शासननिर्णयाची अम्मलबजावणी करणे ही उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी नाही काय? त्यांच्या समोर महाराष्ट्रातील तमाम प्राध्यापकांनी आरत्या ओवाळाव्यात, मंत्रालयाला प्रदक्षिणा घालाव्यात, धुप, दिप, अंगारेधुपारे, या अधिकाऱ्यांना दाखवावे म्हणजेच मग ते या शासननिर्णयाची अम्मलबजावणी करतील असा काही गुप्त शासननिर्णय आहे काय?

### १० महिन्याची थकबाकी रोखीने देणे प्रकरणी २०१२ चा उजेड

**७.** सन २००९ च्या शासननिर्णयाप्रमाणे एप्रिल २००९ ते जानेवारी २०१० अशी १० महिन्याची थकबाकी रोखीने देण्याबाबतचे आदेश ३२ महिन्यापूर्वी निर्गमित झालेले असतांना आंदोलन सुरु झाल्यानंतर चार महिन्यांनी उच्च शिक्षण विभागातील विद्वान अधिकाऱ्यांनी आता १९ एप्रिल २०१२ ला जो शासननिर्णय काढला त्याच्या परिच्छेद तीन मधील तरतुद पुढील प्रमाणे :-

"३. शिक्षकांना दि. १.४.२००९ते दि. ३१.१.२०१० या कालावधीत रोखीने देय रक्कम. एकुण खर्च रु. ५२२.४० कोटी, त्यातील रु. १०४.४८ कोटी (२० टक्के) राज्य शासनाकडून देय आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी आणि मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम रोखीने देण्यासाठी शासनाने रु. ८७.०६ कोटी एवढी रक्कम यापूर्वीच अदा केली असून राज्य शासनाच्या हिश्याची उर्वरीत रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे." असे नमुद करुन पुढे या कामासाठी १७.४२ कोटी रुपयाची तरतुद स्तंभ ३ मध्ये

## *कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण*

### अमरावती विभाग, अमरावती-४४४ ६०४

*दुरध्वनी क्रमांक ०७२१ - २५३१२३५*

***क्रमांक सस‍ं/उशि/अनु-४/२०१२/३९२९***

***दिनांक १०.०७.२०१२***

प्रति,

**प्राचार्य**, सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालये, अमरावती विभाग, अमरावती

**विषय** :- मा. उच्च न्यायालय मुंबई याचिका क्रमांक ३३२४/२०१० शिवाजी विद्यापीठ शिक्षण संघटना विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर

**संदर्भ** : १. संचालनालयाचे पत्र क्रमांक युएनआय/३११८०/१४९४०/ कोवि/विशि-१/१२४०७, दिनांक १४.०६.२०१२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय मुंबई याचिका क्रमांक ३३२४/२०१० चे निर्णयानुसार १४९४० चा लाभ देवून वेतन निश्चिती करावयाची झाल्यास आपले महाविद्यालयामधिल किती अधिव्याख्यातांना त्याचा लाभ मिळेल. तसेच त्यांना देय रक्कम किती ही माहिती खालील विवरणपत्रा Excel २००३ मध्ये शासनास सादर करावयाची असल्यामुळे प्रथम प्राधान्य देवुन सदर माहिती या कार्यालयास तात्काळ दिनांक १४.०७.२०१२ पर्यंत सादर करावी.

सदर माहिती मध्ये जर लाभ मिळत असल्यास सेवा निवृत्त अधिव्याख्यातांचा समावेश करावा.

**विवरण पत्र**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अधिव्याख्यातांचे नाव | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| | एकूण रुपये | | |

### १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडात फेब्रुवारी व मार्च २०१० कसा काय येतो?

८. आता निघालेला १९ एप्रिल २०१२ चा शासननिर्णय काळजीपूर्वक पाहिला तर त्याच्या परिच्छेद ३ मध्ये १.४.२००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालावधीची रक्कम ५२२.४० कोटी रुपये दाखविली असून त्यापैकी फक्त २० टक्के म्हणजे १०४.४८ कोटी रुपये राज्य शासनाला द्यावयाचे आहेत असे दाखविले आहे. वस्तुतः हे २००९ च्या शासननिर्णयाच्या विरोधात आहे कारण त्या शासननिर्णयात स्पष्टपणे "**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" अशी तरतुद आहे. आता २० टक्के म्हणून जी १०४.४० कोटीची रक्कम १.४.२००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी देण्याचे जे चुकीचे व २००९ च्या शासन निर्णयाच्या विरोधात जाणारे गणित २०१२ च्या शासननिर्णयात मांडले त्यात सुद्धा "फेब्रुवारी व मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची ८७.०६ कोटी रुपयाची रक्कम शासनाने अदा केली असल्याने १०४.४८ कोटीमधून कापून घेतली आहे." म्हणजे (१०४.४८ - ८७.०६) = १७.४२ कोटी रुपयाची तरतुद २०१२ च्या या शासन निर्णयात करण्यात आली आहे. असे करतांना फेब्रुवारी व मार्च २०१० हे दोन महिने १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडाचा भाग म्हणून या शासननिर्णयाद्वारे जाहिर करण्याची जी अलौकीक कामगीरी उच्च शिक्षण विभागाच्या विद्वान अधिकाऱ्यांनी पार पाडली त्याबद्दल कोणत्याही कॅलेंडरच्या पंचागकर्त्यांनी या अधिकाऱ्यांचा करावा तेवढा गौरव थोडाच आहे.

### पोरकटपणाचे एकामागून एक उच्चांक

९. वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित झालेला २००९ चा शासननिर्णय जिवंत असतांना, तो रद्द झालेला नसतांना किंवा दुरुस्त झालेला नसतांना १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी त्या शासननिर्णयात "**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" अशी तरतुद असतांना :-

(१) त्या तरतुदीप्रमाणे सन २००९ मध्ये ५२२ कोटी रुपये वितरीत न करता आज २०१२ मध्ये १०४.४८ कोटी रुपयाची तरतुद करणे, हा या शासननिर्णयातील क्रमांक एकचा निर्बुद्धपणा होय व त्यामुळेच सर्वत्र हास्यास्पद व पोरकट असा शासननिर्णय अशी त्याची अवहेलना होत आहे.

(२) या कालखंडासाठी शंभर टक्के थकबाकी देण्याची २००९ च्या शासननिर्णयाने तरतुद केली असतांना २० टक्क्याच्या तरतुदीचा शासननिर्णय काढणे, हा या शासननिर्णयातील क्रमांक दोनचा निर्बुद्धपणा होय व त्यामुळेच सर्वत्र हास्यास्पद व पोरकट असा शासननिर्णय अशी त्याची अवहेलना होत आहे.

(३) १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी या कालखंडासाठी करण्यात आलेल्या १०४.४८ कोटी रुपयाच्या तरतुदीतून फेब्रुवारी व मार्च २०१० हे महिने त्या कालखंडाचा भाग समजून या दोन महिन्याची ८७.०६ कोटी रुपयाची रक्कम १०४.४८ कोटी रुपयातून कापून घेणे हा या शासननिर्णयातील क्रमांक तीनचा निर्बुद्धपणा होय व त्यामुळे सर्वत्र हास्यास्पद व पोरकट असा शासननिर्णय अशी त्याची अवहेलना होत आहे.

## *हास्यास्पद, पोरकट व निर्बुध्दपणाचा शासननिर्णय : २*

### प्रा.बी.टी.देशमुख

*(रविवार, दिनांक ०६ मे, २०१२ च्या दै.'हिंदुस्थान' मध्ये प्रकाशित झालेला प्रा.बी.टी.देशमुख यांचा पुढील लेख जसाच्या तसा प्रसृत करीत आहोत.-**संपादक**)*

### वाढीव महागाई भत्ता अदा करण्याची जूनी पद्धती

**१०.** दर वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या १ तारखेला व १ जुलैला अखिल भारतीय पातळीवर महागाई निर्देशांकामध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या वतीने महागाई भत्त्यामध्ये वाढ केली जाते. **केंद्र शासनाने केलेली महागाई भत्त्यातील वाढ राज्य शासकीय कर्मचारी व अन्य पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्रात झालेला असून फार पूर्वी याबाबतचा मूळ शासननिर्णय महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग काढत असे** व त्यानंतर मग

ती पद्धती बंद केली व नवीन पद्धती सुरु केली.

## वाढीव महागाई भत्ता अदा करण्याची नवीन पद्धती

**११.** गेल्या ५-१० वर्षापासून वर्षातून २ वेळा महागाई भत्त्याच्या वाढी अदा करण्यासाठी शासनाने अंगिकारलेल्या नवीन पद्धती प्रमाणे त्याबाबतचा शासननिर्णय सर्व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी फक्त वित्त विभागाने काढलेला असतो. अशा प्रत्येक शासननिर्णयात पुढील प्रमाणे ठरलेली वाक्य रचना असते. "राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न" व याच शासननिर्णयात पुढे प्रत्येक वेळी "**सदर आदेश सुधारित वेतन संरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.**" अशी तरतुद असते. शासनाने वेळोवेळी परिपत्रके व आदेश काढून हे स्पष्ट केले आहे की "**वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख असतो. इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.**" शासनातर्फे वारंवार हेही स्पष्ट करण्यात आलेले आहे की, "**महागाई भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.**"

## 'चिरीमिरी'ची पद्धती बंद झाली

**१२.** फक्त वित्त विभागानेच शासन निर्णय काढावा, असे ठरल्याने आपापल्या पातळीवर वेगळा शासननिर्णय काढण्याचे इतर विभागांचे अधिकार संपुष्टात आलेत व तसे करतांना थोडीफार "चिरीमिरी" करण्याची संधीसुद्धा पूर्णपणे संपुष्टात आली. याचे मुळ कारण म्हणजे वित्त विभागाने काढलेल्या शासननिर्णयात दरवेळी "यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. **अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उपलेखाशिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.**" असा स्पष्ट उल्लेख असतो व "**महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहील.**" असेहि वित्त विभागाच्या त्या शासननिर्णयातच दरवेळी नमुद असते.

## तरीहि काही ठिकाणी 'चिरीमिरी' सुरुच राहीली

**१३.** शासनाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर "**व्यवस्थेत व्यवस्थित बंदोबस्त**" केल्यानंतरसुद्धा शासनाच्या काही विभागात "चिरीमिरी"चे प्रकार सुरुच राहिले. यात सर्वात वरचा क्रम त्या काळांत शालेय शिक्षण विभागाचा होता. वित्त विभागाचा शासननिर्णय निघाल्यावरसुद्धा काही क्षेत्रिय अधिकारी "**तो शासननिर्णय निघाला तरी वाढलेला महागाई भत्ता केंव्हापासून लागू करायचा हे आमच्या हाती आहे.**" असे भासवित असत. त्यांच्या या अपप्रकाराला वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पाठिंबा असल्याशिवाय त्यांच्यामध्ये ती हिम्मत येत नव्हती हे उघडच आहे. मग क्षेत्रीय स्तरावर आंदोलने व्हायची, नंतर कृपावंत होवून हे अधिकारी वाढलेला महागाई भत्ता लागू करत. हा प्रकार बरेच दिवस चालू होता. तो प्रकार असह्य व्हायला लागल्यावर त्याबाबत अनेक शिक्षकांनी व संघटनांनी तक्रारी केल्या. सभागृहात एका चांगल्या संघर्षानंतर या रोगराईचा बंदोबस्त करण्यात आम्हाला यश आले.

## 'चिरीमिरी'चा सभागृहात बंदोबस्त

**१४.** सन २००८ च्या तिसऱ्या अधिवेशनामध्ये आमचा "**वाढीव महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ४६२३० हा बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २००८ च्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये पहिल्याच क्रमांकावर समाविष्ट होता. "दरवेळी महागाई भत्ता वाढ देतांना "**प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता रहाणार नाही. मंजूर अनुदानातच तो खर्च करावा**" असे शासनाचे स्पष्ट आदेश असतांना दरवेळी महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अमरावती जिल्हा कार्याध्यक्षांनी दिनांक २३ ऑगस्ट, २००८ रोजी किंवा त्या दरम्यान मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग

**१५.** आमच्या उपरोक्त ४६२३० या तारांकित प्रश्नाचा भाग तीन पुढील प्रमाणे होता. "**पुरवणी मागणी मान्य झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत थकीत देयके देऊ नये**" असे आदेश (क्रमांकःअमाशा/२००७-०८ वाढीव म.भ./१५ क ४) शिक्षण संचालकांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २००७ रोजी काढले व बरीच आंदोलने झाल्यानंतर त्याच शिक्षण संचालकांनी दिनांक १२ जून, २००८ रोजी आदेश (क्रमांक अशामा/०८-०९/वाढीव म.भ./१५ क ४) काढून "**वरील परिस्थितीचा विचार करता वेगळी तरतुद उपलब्ध झालेली नसली तरी मुळ मंजूर तरतुदीतून वाढीव महागाई खर्च करण्याची परवानगी दिली**" ही गोष्ट खरी आहे काय," या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये सुद्धा शासनाने ती वस्तुस्थिती असल्याचे मान्य केले होते.

## अधिकाऱ्यांनी चूक केली आहे - मंत्रीमहोदय

**१६.** उपरोक्त प्रश्नावर चर्चा सुरु झाली. तेव्हा पहिल्याच उप प्रश्नाला मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. :-

"**डॉ. पतंगराव कदम :** महोदय, **हे खरे आहे की, विभागातील काही लोकांनी ही चूक केली आहे. परंतु शासनाने यासंबंधीचे कालच स्पष्ट असे आदेश काढलेले आहेत की अशा प्रकारे पुन्हा आदेश काढण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळेस सरकारी कर्मचाऱ्यांबाबतचा निर्णय होतो त्याच वेळेस शिक्षकांना सुध्दा महागाई भत्त्याची रक्कम देण्यात यावी.**"

या प्रश्नावरील अनुपुरक चर्चेचा शेवट मा. शालेय शिक्षणमंत्र्यांच्या पुढील उत्तराने झाला. :-

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१२ ते दि. ३१ मार्च, २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याची थकबाकी देण्याबाबत*

### *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*
### *शासन निर्णय क्रमांक मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा- ९*
### दिनांक : १० जुलै, २०१२

**संदर्भ** :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९, दिनांक ९ एप्रिल, २०१२

**शासन निर्णय :**

शासन निर्णय समक्रमांक दि. ९ एप्रिल, २०१२ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी, २०१२ पासून सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५८ टक्के वरुन ६५ टक्के करण्यात आला आहे. तसेच दि. १ एप्रिल, २०१२ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात आली आहे.

२. शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी, २०१२ ते दि. ३१ मार्च, २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील.

४. सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०७१०१०५२३५०७० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शि.म.म्हात्रे)**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

PR :- (1) NB 2009 P 239 (2) NB 2009 P 232 (3) NB 2009 P 233 (4) NB 2010 P

चुका केल्या असतील त्यांची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.”**

## शालेय शिक्षण विभागाला कडक आदेश काढावे लागले

**१७.** सभागृहामध्ये बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २००८ रोजी मा. शालेय शिक्षणमंत्री उत्तर देत होते व या प्रकाराचा बंदोबस्त करणारे कडक आदेश (क्रमांक : शिकाना २००८(५७/०८)/माशि-२ दिनांक २३ डिसेंबर, २००८) त्यांनी एक दिवस अगोदर काढले होते. तसे त्यांनी सभागृहात चर्चेच्या वेळी सांगितले. त्या आदेशात स्पष्टपणे असे नमुद होते की, “**वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख करतात.** इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.......**महागाई भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.**” या आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे तरतुद आहे. :-

“**अर्थसंकल्पीय अंदाज शासनास सादर करतांना, दोन वाढीव महागाई भत्त्याची अंदाजीत रक्कम वार्षिक वेतनवाढ गृहित धरुन चालू वर्षापेक्षा साधारणतः २० टक्के वेतनावरील वाढीव खर्च दर्शविणे अपेक्षित आहे. असा खर्च दर्शविल्यास राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसोबतच पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता वित्त विभागाच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देता येवू शकतो.**”

## गंभीर स्वरुपाची कारवाई होईल- शासन

**१८.** २३ डिसेंबर २००८ च्या आदेशाच्या परिच्छेद ५ मध्ये शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देतांना तो नियमित तरतुदीतूनच शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना निदेश देण्यात यावेत.”

त्याच आदेशात शेवटी परिच्छेद ६ मध्ये स्पष्टपणे गंभीर स्वरुपाच्या कारवाईचा इषारा पुढील शब्दात देण्यात आलेला आहे. :-

“**वाढीव महागाई भत्ता विहीत महिन्यात अदा न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल, याबाबतही सर्व संबंधितांना कृपया जाणिव करुन देण्यात यावी.**”

## महामारी उच्च शिक्षण विभागात घुसली

**१९.** महागाई भत्ता वाढ देतांना शालेय शिक्षण विभागात घुसलेल्या ‘चिरीमिरी’च्या महामारीने त्यावेळी घातलेल्या थैमानाचे एवढे तपशीलवार वर्णन देतांना मला हे जाहिरपणे नमुद केले पाहिजे की सन २०११ चा अपवाद सोडला तर तत्पूर्वीच्या ५-१० वर्षात उच्च शिक्षण विभागात चिरी मिरीची ही महामारी कधीही दिसून आली नाही. पण तिकडे शालेय शिक्षण विभागातून या महामारीचे उच्चाटन झालेले असतांना सन २०११ मध्ये मात्र या महामारीचे थैमान उच्च शिक्षण विभागात जोराने सुरु झाले असे दिसून येते. प्राध्यापकांचे आंदोलन सुरु झाल्यावर आपण काहीतरी करीत आहोत हे दाखविण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने १९ एप्रिल २०१२ रोजी जो हास्यास्पद शासननिर्णय काढला त्याच्या परिच्छेद ५ मध्ये “दि. १.५.२०११ पासून दि. ३०.९.२०११ पर्यंत ६ टक्के महागाई भत्याच्या वाढीची रक्कम (माहे ऑक्टोबर २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरीत माहे मे ते सप्टेंबर २०११ या कालावधीतील रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे.)” अशी मोठी साळसुद तरतुद करण्यात आली आहे व त्यासाठी

***Arrears of Dearness Relief on Pension/Family Pension w.e.f. 1st January, 2012 to 31st March, 2012***

**GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT**

**GOVERNMENT RESOLUTION, : NO.DRP-2012/CR.41/SER-4,**

Mantralaya, Mumbai- 400 032, dated : 12th July, 2012

**Read-** Government Resolution, Finance Department, No. DRP- 2012/CR.41/SER-4 dated 17th April, 2012.

# RESOLUTION

The rate of dearness relief with effect from 1st January, 2012 to the State Government pensioners/family pensioners on their Basic Pension/Family Pension and Dearness pension/ Dearness family pension (if any) have been enhanced from 58% to 65% vide Government Resolution referred above. The amount of Dearness relief have been paid in cash w.e.f. 1st April, 2012.

2. Government has decided to pay the amount of dearness relief to the State Government pensioners/family pensioners on their Basic Pension/Family Pension and Dearness pension/ Dearness family pension (if any) w.e.f. 1st January,2012 to 31 March, 2012 in cash.

3. Government is pleased to decide that It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

4. Government is also pleased to direct that above decision should, **mutatis mutandis,** apply to those employees including family pensioners of **Recognised and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government Colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.**

5. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961(Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

7. State Government Employees who had drawn lumpsum payment on absorption in a PSU/autonomous body/Local Bodies and have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department, No. COP1099/306/SER-4, dated 15th November 1999 will also be entitled to the payment of dearness relief on full pension as per the provision of Government Resolution, Finance Department, No. COP-1001/50/SER-4, dated 9th April 2001, at the prescribed rate and from the date, prescribed in paragraph 1 above.

8. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

9. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, ***mutatis mutandis,*** apply to the dearness relief now sanctioned.

10. This Government Resolution is available on the web site of Government of Maharashtra i.e.-“www.maharashtra.gov.in” and its computer code number is 201207111420590700

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**Shubhangi Sheth**

Deputy Secretary to Government

PR :- (1) NB 2009 P 239 (2) NB 2009 P 222 (3) NB 2009 P 223 (4) NB 2010 P 81 (5) NB 2011 P 125 (6) NB 2011 P 125 (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2012 P 59

** AF : P 46 **

## वित्त विभागाच्या आदेशाची उच्च शिक्षण विभागाने अवहेलना करण्याचे कारण काय?

**२०.** खरे म्हणजे १ मे २०११ पासून वाढलेला ६ टक्के महागाई भत्ता (४५ टक्क्यावरुन ५१ टक्के) महाराष्ट्रातील सर्व शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना (सर्व स्तरावरचे शिक्षक धरून) २६ एप्रिल २०११ च्या आदेशाने (शासन निर्णय क्रमांक मभवा-११११/प्र.क्र.६४/सेवा-९) लागू झालेला आहे. "१ मे २०११ पासून तो रोखीने द्यावा" हे त्या आदेशातच नमुद आहे. वित्त विभागाचा हा शासननिर्णय उच्च शिक्षण विभागाला लागू आहे. असेहि त्या आदेशातच आहे. त्या आदेशात असेहि नमुद आहे की "महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील."...... "यावर होणारा खर्च 'संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते' ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. **अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.**"

## महागाई भत्त्यातील २०११ मधील दुसरी वाढ

**२१.** सदर १९ एप्रिल २०१२ च्या हास्यास्पद शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये "माहे ऑक्टो.२०११ ते फेब्रु.२०१२ या कालावधीतील ७ टक्के महागाई भत्याची रक्कम" या मथळ्याखाली तरतुद करण्यात आली असून "अशासकीय अनुदानीत महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी)" यासाठी ४४.८१ कोटी रुपयाची तरतुद करण्यात आल्याचे दाखविले असून "अनुदानीत अध्यापक महाविद्यालये"साठी तरतुद निरंक करण्यात आली आहे.

खरी गोष्ट अशी आहे की "अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५१ टक्क्यांवरुन ५८ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी." असे स्पष्ट आदेश शासन निर्णय क्रमांक मभवा-११११/प्र.क्र.६४/सेवा- ९ अन्वये वित्त विभागाने दिनांक ४ ऑक्टोबर २०११ रोजी काढले असून त्याच्या परिच्छेद ३ मध्ये "महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याच प्रकारे यापुढेही लागू राहतील." असे नमुद केले आहे व त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये "अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा." असेहि स्पष्टपणे नमुद केले आहे.

## न केलेली मागणी मान्य करणारा शासननिर्णय

**२२.** खरे म्हणजे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आंदोलन सुरु करतांना दिलेल्या निवेदनात व मागणीपत्रांत महागाई भत्ता विलंबाने लागू केल्याबद्दल तक्रार नव्हती व ती थकबाकी द्यावी अशी मागणीही नव्हती. "**चोराच्या मनांत चांदणे" या न्यायाने कदाचित याहि विषयाबाबत आपल्याला जाब विचारला जाईल,** या अपराधी पणाच्या भावनेने १९ एप्रिल २०१२ च्या हास्यास्पद शासननिर्णयामध्ये "सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये लागू करण्यात आलेल्या ६ टक्के आणि ७ टक्के महागाई भत्याच्या फरकाची रक्कम .......

## हास्यास्पद, पोरकट व निर्बुद्धपणाचे एकामागून एक विक्रम

**२३.** " शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ मे २०११ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर **४५ टक्क्यांवरुन ५१ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.**" असा आदेश (क्रमांक मभवा-११११/प्र.क्र.६४/सेवा- ९) **एकदा वित्त विभागाने** दिनांक २६ एप्रिल २०११ रोजी काढल्यानंतर व त्याच वर्षात "शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ ऑक्टोबर २०११ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर **५१ टक्क्यांवरुन ५८ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.**" असा आदेश ४ ऑक्टोबर २०१२ रोजी काढल्यानंतर १९ एप्रिल २०१२ च्या उच्च शिक्षण विभागाच्या शासननिर्णयामध्ये परिच्छेद ६ व ७ वर ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यातून त्या शासननिर्णयातील हास्यास्पदता, पोरकटपणा व निर्बुद्धपणा अधोरेखीत करणारे पुढील प्रश्न आता निर्माण झाले आहेत.

(१) महागाई भत्त्याची वाढ वित्त विभागाच्या एकाच शासननिर्णयाने उच्च शिक्षण विभागासह सर्व सरकारी कर्मचारी व अनुदानित संस्थामधील सर्व पात्र कर्मचारी यांना लागू होत असतांना, त्यासाठी वेगळे शासननिर्णय काढण्याची गरज नसतांना, **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वेगळा शासननिर्णय काढून "विशेष सन्मानजनक वागणूक" देण्याचा अधिकार उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना कोणी दिला?**

(२) अशासकिय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होईल त्या तारखेपासून वाढीव महागाई भत्ता आम्ही देवू, मात्र अशासकिय अनुदानित कला, वाणिज्य विज्ञान व विधी महाविद्यालयातील प्राध्यापकांना आम्हाला वाटते तेवढ्या उशिराने आम्ही वाढीव महागाई भत्ता लागू करू. ही जी वस्तुस्थिती १९ एप्रिल २०१२ च्या हास्यास्पद शासननिर्णयाने पुढे आलेली आहे, **त्यात अंतर्भूत असलेली भेदभावपूर्ण कृति करण्याचा अधिकार उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना कोणी बहाल केलेला आहे.?**

(३) वित्त विभागाने जरी शासन निर्णय काढला तरी त्यानंतर आमच्या भोवती चकरा मारल्या पाहिजेत, आमची आरती काढली पाहिजे, आमच्या तोंडासमोर अंगारे धुपारे केले पाहिजेत तरच आणि तेंव्हाच आम्ही वाढीव महागाई भत्ता लागू करू, **अशा एका नव्या कालखंडाची सुरुवात करण्याचा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा हा निर्णय कोणत्या शासननिर्णयावर आधारित आहे?**

**२४.** १९ एप्रिल २०१२ चा हा शासननिर्णय निघाल्यावर मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी टी.व्ही.वर मुलाखत देवून अत्यंत आनंदाने "**आम्ही आता शासन निर्णय काढला आहे. प्राध्यापकांच्या बहुतांशी मागण्या आता मान्य झाल्या आहेत त्यांनी आता आंदोलन मागे घ्यावे**" असे सांगावे याचे अत्यंत दुःख होते. मा. उच्च शिश्रणमंत्र्यांनी १९ एप्रिलचा हा शासननिर्णय काळजीपूर्वक मुळातून वाचला तर त्यातील पोरकटपणा व निर्बुद्धपणा लक्षात आल्यावर ते सुद्धा पोट धरधरून हसतील अशी आम्हाला खात्री आहे.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

---------------------------------------------------

To,..........................................................

.............................................................

.............................................................

.............................................................